

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'- कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली



**कॉमर्स विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने**

'पारंपरिक उद्योजकतेच्या विचारसरणीची पुन:बांधणी'

Azadi Ka Amrit Mahotsav

या विषयावर आयोजित

## एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा

दिनांक: २४ नोव्हेंबर २०२२

### कार्यशाळेचा अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) या महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२रोजी महिला बचत गट, ग्रामीण भागातील लहान उद्योग चालविणारे उद्योजक, होलसेल दुकानदार, शेतीमाल उत्पादक शेतकरी यांच्यासाठी एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेसाठी या क्षेत्रातील तज्ञ, अर्थमंत्रालय, थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार, मा. श्री. चेतन अरूण नरके साहेब यांनी सखोल मार्गदर्शन केले. पारंपरिक उत्पादनांऐवजी बचत गटांनी दुग्धोत्पादनाकडे वळावे बचत गटांनी बाजारपेठेच्या अपेक्षा समजून घेणे गरजेचे असल्याचे मत मा. चेतन नरके यांनी व्यक्त केले.

बचत गटातील महिलांनी डोळसपणे बाजारपेठ समजून घेणे गरजेचे आहे. आपण तयार करीत असलेल्या वस्तू बाजारपेठेत कोण विकत घेणार आहे, हे आधी निश्चित असले पाहिजे. महिलांनी पारंपरीकपद्धतीने उन्हाळी पदार्थ, मेणबत्ती, उदबत्ती बनविण्यापेक्षा नव्या संधी शोधाव्यात. येणाऱ्या काही दिवसात भारतामध्ये दुग्धोत्पादन क्षेत्राला चांगले दिवस असणार आहेत. तेव्हा महिलांनी शेतीकामाला जोडधंदा म्हणून पशूपालन करणे, दुग्धोत्पादन करणे, दुग्धजन्य पदार्थ बनविणे व त्याची विक्री करणे याकडे वळावे. बचत गटामध्ये काम करणाऱ्या महिलांनी व्यावसायिक शिस्त अंगी बानवली पाहिजे. पैशाचे योग्य व्यवस्थापन, बाजारपेठेचा सूक्ष्म अभ्यास आणि झोकून देऊन काम करण्याची तयारी ठेवली तर महिला बचत गट खूप मोठे यश मिळवू शकतात. बचत गटांनी कलाकुसरीच्या वस्तूंची निर्मिती केल्यास अधिक पैसा उभा करण्याची संधी मिळू शकते असे मा. चेतन नरके यांनी विचार मांडले.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात जे. के. (बापू) जाधव म्हणाले, ''महिलांनी आत्मविश्वासाच्या बळावर देशाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून आदर्श अर्थकारण गावखेड्यात निर्माण केले आहे. त्याचा सखोल अभ्यास करून त्रुटी दूर करण्याचे काम होणे गरजेचे आहे.'' यावेळी प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, नागराळे गावच्या सरपंच सौ. वनिता पाटील, धैर्यशील पाटील आदी मान्यवर आणि महिला बचत गटांमध्ये काम करणाऱ्या स्त्रीयां, लघुउद्योजक आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. स्वागत प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार प्रा. प्रतिभा पुदाले यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे, डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. सचिन चव्हाण ,प्रा. प्रतिभा पुदाले, प्रा. बी. डी. पाटील, यांनी केले.

**कार्यशाळेची फलनिष्पत्ती:**

- बचतगटातील महिलांना नवीन संधींचे मार्गदर्शन मिळाले
- लघुउद्योजकांना आयात निर्यात आणि उत्पादन वाढीबाबत मार्गदर्शन मिळाले
- नवीन उद्योग सुरु करण्यासाठी शासकिय योजनांची माहिती मिळाली
- विद्यार्थ्यांच्यामध्ये उद्योजकतेसंदर्भात जागरुकता निर्माण झाली

**कार्यशाळेचे लाभार्थी-**

महिला बचतगट प्रतिनिधी- २२५
लघुउद्योजक-६
विद्यार्थी- ५३
**एकुण लाभार्थी: २८४**




कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना मा. चेतन अरूण नरके



कर्मवीर पुतळयास आदरांजली वाहताना कार्यशाळेचे मान्यवर

**विभागप्रमुख**
वाणिज्य विभाग

**विभागप्रमुख**
राज्यशास्त्र विभाग

**प्र.प्राचार्य**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली)